**नि.फौ.ख.क्र. २८४/२०२२**

**सरकार –वि– नानासाहेब आहेर**

**निशाणी क्र. २२**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची शपथेवर जबानी.**

नांव – शंकर अंबादास जाधव

वय – ३०

धंदा – शेती

राहणार – भुत्याणे, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.२८.०५.२०२२ रोजी मला पोलिसांनी लेंडी नदीच्या पुलावर भुत्याणे शिवारात पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोयता जप्त केला व तसा जप्ती पंचनामा तयार केला. मला आता दाखवलेला घटनास्थळ व जप्ती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर पंच म्हणून १ नंबरला माझी सही आहे. तसेच त्यावर इतर पंचांची देखील सही आहे. पंचनाम्याला **निशाणी २३** देण्यात येते. पोलिसांनी माझ्यासमक्ष जो कोयता जप्त केला होता तो दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला आता दाखवलेला कोयता तोच आहे. त्याला **आर्टीकल अ** देण्यात येते. त्यावर माझी सही आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. के. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. माझे वय ३० ते ३१ वर्ष आहे. फिर्यादी माझा मावसभाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीची आई व माझी आई सख्ख्या बहिणी आहेत व दुसरा पंच दिपक घडोजे रा. कानमंडाळे हा माझा व फिर्यादीचा मावस भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की माझी आई, फिर्यादीची आई व दुसरा पंच दिपकची आई सख्ख्या बहिणी आहेत.

३. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीच्या जन्मापासून त्याच्या

आईवडीलांमध्ये चालू होते. ते वाद कशावरुन होते हे मला सांगता येणार नाही. फिर्यादीने वाटपासाठी त्याच्या वडीलांविरुद्ध, काकांविरुद्ध व आत्याविरुद्ध न्यायालयात दावा दाखल केलेला आहे याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी फिर्यादीचा काका आहे. मी गावामध्ये राहत असल्यामुळे फिर्यादीच्या शेताची तसेच शेताकडे जाणाऱ्या रस्त्यांची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळाच्या आजूबाजूला ४० ते ५० लोकांची घरे आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की घटनास्थळाच्या आजूबाजूला ४ ते ५ लोकांची घरे आहेत.

४. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या पूर्वेला साहेबराव शिंदे, अंबादास आहेर, रामदास आहेर यांची घरे आहेत. तसेच शेजारी मालसाणे वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या पूर्वेला थोड्या अंतरावर प्रभाकर बोरगुडे, बाळू बोरगुडे, वाळू बोरगुडे व जयराम बोरगुडे यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या पश्चिमेला एकनाथ कुंभार्डे, बाजीराव कुंभार्डे, दिलीप कुंभार्डे, भास्कर आहेर, दिपक महाले यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की लेंडी नाल्याच्या पाठीमागे कोंबडवस्ती आहे व त्या वस्तीवर ७ ते ८ घरे आहेत. साधारणतः २५ लोक त्या वस्तीवर राहतात. हे म्हणणे खरे आहे की पुलाच्या पुढे दक्षिणेला रामदास आहेरचे घर आहे व शेजारी सुभाष पवारचे किराणा दुकान आहे.

५. पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी नोटीस दिली नव्हती. पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी फोनकरुन बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की मी व फिर्यादीने आरोपीच्या घरी जाऊन त्याला धमकी दिल्यामुळे आमच्याविरुद्ध चांदवड पो.स्टेशनला फिर्याद दाखल आहे. फिर्यादी भुत्याणे ते मालसाणे रोडवर आहेर वस्तीवर राहतो. भुत्याणे गावापासून आरोपीचे घर साधारणतः एक ते दिड कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी व त्याची आई शेती करतात.

६. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी पंचनामा वडनेर भैरव पो.स्टेशनला तयार केला व मी त्यावर पो.स्टेशनला सही केली. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल अ कडील कोयता फिर्यादीने पोलिसांना काढून दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळी पंचनाम्यासाठी कधीही गेलो नाही व माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा तयार केला नाही तसेच आर्टीकल अ कडील कोयता देखील माझ्यासमक्ष जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी

व त्याचे भाऊ फिर्यादीला व त्याच्या आईला वाटून क्षेत्र देत नसल्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुद्ध सदरची खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की आर्टीकल अ कडे जो कोयता आहे तसे कोयते हार्डवेअरच्या दुकानात मिळतात व त्यांचा वापर शेतकरी शेतीकामासाठी करतात. हे म्हणणे खरे आहे की न्यायालयात साक्ष देण्यासाठी आज मी फिर्यादी व दुसरा पंच दिपक एकत्र मोटारसायकलने आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की न्यायालयामध्ये काय साक्ष द्यायची याबाबत आमच्या तिघांमध्ये विचारविनिमय झाला. पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी जेव्हा बोलाविले होते तेव्हा तेथे ४ ते ५ लोक होते. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी इतर लोकांची साक्ष न नोंदवता केवळ माझी व दिपकची पंच म्हणून साक्ष नोंदवली. पंचनाम्यासाठी मी गेलो तेव्हा तेथे फिर्यादी हजर होता व त्याने घटनास्थळ दाखवले. पोलिसांनी पंचनाम्यावेळी नकाशा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळावर न गेल्यामुळे पोलिसांनी घटनास्थळ नकाशा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल अ कडील कोयता मी व फिर्यादीने पोलिसांना काढून दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल अ कडील कोयता फिर्यादीने त्याच्या घरातून पोलिसांना काढून दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमक्ष पोलिसांनी कोणताही जप्ती पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी व त्याच्या आईच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.01.07 15:52:42 +0530

**दि. ०७.०१.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**

**नि.फौ.ख.क्र. २८४/२०२२**

**सरकार –वि– नानासाहेब आहेर**

**निशाणी क्र.२४**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची शपथेवर जबानी.**

नांव – दिपक त्र्यंबक घडोजे

वय – २२

धंदा – शेती

राहणार – कानमंडाळे, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.२८.०५.२०२२ रोजी मला पोलिसांनी लेंडी नदीच्या पुलावर भुत्याणे शिवारात पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोयता जप्त केला व तसा जप्ती पंचनामा तयार केला. मला आता दाखवलेला घटनास्थळ व जप्ती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर पंच म्हणून २ नंबरला माझी सही आहे. तसेच त्यावर दुसऱ्या पंचांची देखील सही आहे. तो पंचनामा निशाणी २३ कडे आहे. पोलिसांनी माझ्यासमक्ष जो कोयता जप्त केला होता तो दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला आता दाखवलेला कोयता तोच आहे. त्याला **आर्टीकल अ** देण्यात येते. त्यावर माझी सही आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. के. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. कानमंडाळे ते भुत्याणे अंतर ८ ते ९ किमी आहे. हे म्हणणे खरे आहे

की फिर्यादी व दुसरा पंच शंकर जाधव हे माझे सख्खे मावसभाऊ आहेत. फिर्यादी व त्याच्या आईचे वाटपावरुन फिर्यादीच्या जन्मापासून फिर्यादीचे वडील व आरोपीसोबत वाद चालू आहेत किंवा कसे याची मला माहिती नाही.

३. पोलिसांनी पंचनाम्यासाठी मला नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी पंचनाम्यासाठी मला फोन केला नव्हता. केवळ दुसरा पंच शंकर जाधवला फोन आला होता म्हणून मी त्याच्यासोबत गेलो होतो. घटनास्थळी आम्ही दुपारी १२ ते १ च्या दरम्यान गेलो होतो. पंचनामा किती वाजता चालू होऊन किती वाजता संपला याची मला माहिती नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की आर्टीकल अ कडील कोयता एकदम नवीन आहे. हे म्हणणे खरे आहे की असे कोयते हार्डवेअरच्या दुकानात मिळतात व त्यांचा उपयोग शेतकरी चारा कापण्यासाठी करतात. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नाही. पोलिसांनी पंचनाम्यावेळी माझ्यासमक्ष नकाशा तयार केला होता. तो नकाशा घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासोबत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पंचनाम्यावर केवळ पोलिसांच्या सांगण्यावरुन सही केली. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा पोलिसांनी लिहिला त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की आर्टीकल अ कडील कोयत्याला एकदम धार आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर कोयत्याला एकदम धार असल्यामुळे तो वापरातला नसून नवीन कोयता आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमक्ष कोणतीही पंचनाम्याची कार्यवाही झाली नाही. केवळ फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी पो.स्टेशनला येऊन तयार पंचनाम्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की तो कोयता मी व फिर्यादीने पो.स्टेशनला नेऊन दिलेला आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की आज न्यायालयामध्ये मी, फिर्यादी व दुसरा

पंच शंकर जाधव एकत्र मोटारसायकलने आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी व त्याच्या आईला आरोपी व त्याचे भाऊ वाटणी करुन देत नसल्यामुळे त्यांच्यावर दबाव निर्माण करण्यासाठी फिर्यादीने सदरची खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी माझ्यासमक्ष जो पंचनामा व नकाशा तयार केला तो आज न्यायालयात दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.01.07 15:52:52 +0530

**दि. ०७.०१.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**